# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ८०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १०/०२/२०१८

**१) ट्रॅक्टरच्या धडकेत एक जखमी . :–**

दिनांक ०८/०२/२०१८ चे १९.३० ते २०.०० वाजता दरम्यान यातील आरोपीने त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन मोटार सायकल क्र.एमएच ३६ पी ४७४० ला धडक मारून, मोटार सायकल चालक – नरेश ऊके रा. सुरेवाडा पु. यास गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी सनम नरेश ऊके वय २२ वर्ष रा. सुरेवाडा पु. यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील पोहवा. सेलोकर पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) मोटार सायकलची चोरी. :–**

दिनांक ०८/०२/२०१८ चे २२.३० ते २२:४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी ईमरान नवाब शेख वय २८ वर्ष रा. अन्सारी वार्ड भंडारा यांचे वडीलाचे नाववर असलेली काळा–लाल पट्टा असलेली दुचाकी डिवो क्र. एमएच ३६ एन ३११३ कि. २५,०००/रु. ची ही मुगल गार्डन रेस्टॉरंट गिरोला समोर ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन, चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३७९ अन्वये. गुन्हा दाखल करण्यात आला. पोहवा. खैरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलची चोरी. :–**

दिनांक ०७/०२/२०१८ चे १७.०० ते १८.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी रामदयाल शिवलाल पटले वय ४३ वर्ष रा. मोहाडी खापा याने त्याची हिरो होंडा स्पलेडंर मोटार सायकल क्र. एमएच ३६ डी ५२९८ कि. २५,०००/रु. ची शेतावर जावुन मोटार सायकल ही शेताजवळील डांबरी रोडवर चाबी लावुन ठेवली असता यातील कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन, चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३७९ अन्वये. गुन्हा दाखल करण्यात आला. सफौ. उईके पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**४) महिलेचा विनयभंग करून मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०८/०२/२०१८ चे १९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही आपले घरी हजर असतांनी यातील आरोपीने घरात प्रवेश करून घराचे दार बंद करून फिर्यादीस अश्लिल शब्दात बोलुन लैंगिक शेरेबाजी करून शिवीगाळ केली व मारपीट करून पुढेही मारण्याची धमकी दिल्याने, फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ४५२,३५४(अ)(४),३२३,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. इंगळे पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**५) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०९/०२/२०१८ चे १३.०० ते १३.१५ वाजता दरम्यान यातील आरोपी महिद्रा पिकअप गाडी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन बावणकर चौक तुमसर येथे आमरोडवर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. धावळे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. धावळे पो. स्टे. तुमसर हे करीत आहेत.

६) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक ०९/०२/२०१८ चे १५.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील अल्ट्रो गाडी ही जिल्हा परीषद चौक भंडारा येथे आमरोडवर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. गजभिये यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. साबळे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

७) उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–

दिनांक ०१/०२/२०१८ चे ०९.३० वाजता. पो.स्टे. अजनी नागपुर शहर येथुन मर्ग डायरी क्र. ००/१८ कलम १७४ जा.फौ. अन्वये प्राप्त झाली. सदर मर्ग सुचना मध्ये पोहवा. ६५५ माहुर्ले यांना नागपुर पोलीस बुथ येथुन फोनद्वारे सुचना मिळाली यातील मृतक मनोहर धनलाल मेहर हा वय ६० वर्ष, रा. संताजी मंगल कार्यालय बावणकर चौक तुमसर हा दि. ०१/०२/२०१८ चे ०९.३० वा. घराचे शेजारी राहनारे घराचे स्लॅप वरून खाली पडला तेव्हा डोक्यातुन व कानातुन रक्त निघाले, त्याला प्रथम उपचाराकरीता सु.बो. दवाखाना येथे भरती केले नंतर सा.रू. भंडारा येथे रेफर करण्यात आले व तेथुन मेडीकल हॉस्पीटल नागपुर येथे, दि.०१/०/२०१८ चे १७.१६ वाजता भरती केले असता दि. ०३/०२/२०१८ चे १६.०० वाजता उपचारा दरम्यान जखमी मरण पावल्याने, पोस्टमार्टम करून सदर कागदपत्रावरून सरतर्फे फिर्यादी पोना. तांडेकर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चिचखेडे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

८) अवैध दारु अड्डयांवर धाडी . :–

दिनांक ०९/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा येथे अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०१ गुन्हा दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०५लिटर हातभट्टी दारू+ १ कॅन किंमती ७५०/रु. चा माल जप्त करण्यात आला.

९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ०९/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०१ तीन सिटर वाहनाकरीता ०५ ईतर वाहनांवरती – १०० केसेस करण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

(मपोउपनी. माया चाटसे)
महिला सेल भंडारा
दुरध्वनी.क्र.९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.